सकाळ

# वैमानिक गिरवणार पुणे विद्यापीठात धडे

## हवाई दलाच्या पुढाकाराने 'एअर चिफ मार्शल अर्जन सिंग अध्यासन केंद्र' सुरू

पुणे, ता. २९ : 'ऑक्सफर्ड ऑफ द ईस्ट' अशी बिरुदावली मिरविणाऱ्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा आणखी एक तुरा खोवला गेला आहे. विद्यापीठात एका नव्या अभ्यासपर्वाची सुरुवात झाली असून, आता हवाई दलाचे फायटर पायलट आणि अधिकारी विद्यापीठात सामरिक नीती, आंतरराष्ट्रीय संबंध अशा पूरक विषयांचा अभ्यास करणार आहेत. यासाठी विद्यापीठात एअर चिफ मार्शल अर्जन सिंग यांच्या नावाने अध्यासन केंद्र स्थापन करण्यात आले आहे. यासंबंधीच्या करारावर आज स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.



**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ : सामंजस्य करारावर एअर मार्शल अमित देव आणि कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी स्वाक्षरी केली.**

### अध्यासन केंद्राची वैशिष्ट्ये

- राष्ट्रीय सुरक्षा व सशस्त्र दलाविषयी नागरिकांमध्ये जागृती
- राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित समकालीन व भविष्यकालीन विषयांवर संशोधनासाठी चर्चासत्र, कार्यशाळा भरवणे
- दरवर्षी हवाई दलातील अधिकारी प्रवेश घेणार
- पुणे विद्यापीठातील विद्यार्थ्यांना हवाई दलाच्या ठिकाणी भेट देता येणार

> **हवाई दलासोबत पुणे विद्यापीठाचा सामंजस्य करार महत्त्वपूर्ण आहे. संरक्षण विषयाचा अभ्यास करण्यासाठी अध्यासन केंद्र सुरू करण्याचा पहिला मान संपूर्ण देशात पुणे विद्यापीठाला मिळाला, हा आमच्यासाठी गर्वाचा क्षण आहे.**
>
> – **डॉ. नितीन करमळकर,** कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

कुलगुरू डॉ. नितीन करमळकर आणि एअर मार्शल अमित देव यांनी यावर स्वाक्षरी केली. या अध्यासन केंद्रासाठी विद्यापीठाला एक कोटी रुपयांची देणगी देण्यात आली आहे. अर्जन सिंग हे 'मार्शल ऑफ द एअर फोर्स' हे पद भूषविणारे पहिले आणि एकमेव अधिकारी होते. "शांतता, राष्ट्रीय सुरक्षा यावर शैक्षणिक संस्था, थिंक टँकचा आधार महत्वाचा आहे. हवाई दलाच्या प्रशिक्षणासाठी संस्था असल्या तरी त्यात सर्वांना प्रवेश मिळत नाही, त्यामुळे पुणे विद्यापीठात सुरू केलेले अध्यासन केंद्र हे महत्त्वाचे आहे. हवाई दलाचे अधिकारी सुटी टाकून या ठिकाणी प्रवेश घेतील. त्यांच्या या ज्ञानाचा वापर देशाच्या संरक्षणासाठी होईल," असे अमित देव यांनी सांगितले. एअर व्हाइस मार्शल एल. एन. शर्मा, ग्रुप कॅप्टन शक्ती शर्मा, विंग कमांडर व्ही. के. बंधू, विंग कमांडर राहुल भसिन, एअर कमांडर एस. पी. भंडारे, स्क्वॉड्रन लीडर मधुमिता दत्त, स्क्वॉड्रन लीडर रिना, विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. नितीन करमळकर, प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, विभागप्रमुख डॉ. विजय खरे, एअर मार्शल (निवृत्त) भूषण गोखले या वेळी उपस्थित होते.

Pune, Main
01/03/2020 Page No. 4